**ठळक बातम्या**

- सायबर फसवणूक टाळण्यासाठी तातडीनं तक्रार देण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन
- ऑनलाइन खरेदी करताना ग्राहकांची होणारी फसवणूक टाळण्य़ासाठी केंद्र सरकार अधिक उपाययोजना करणार
- सिंधुदुर्गमध्ये समुद्रात बुडून चौघांचा मृत्यू, चौघांचा शोध सुरू

**आणि**

- वेस्ट इंडिज विरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात आज के. एल. राहुल, ध्रुव जुरेल आणि रविंद्र जडेजा यांची शतकं /भारताकडे २८६ धावांची आघाडी

<><><><>

तातडीने तक्रार दिल्यास सायबर फसवणुकीतले नुकसान टाळता येऊ शकते. सायबर फसवणूक झाल्याचं लक्षात येताच १९३० किंवा १९४५ या हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचं आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं. ते आज मुंबईत सायबर जनजागृती महिन्याच्या उद्घाटन सोहळ्यावेळी ते बोलत होते. विविध सायबर गुन्ह्यांमुळे होणारी आर्थिक आणि मानसिक हानी रोखण्यासाठी हे गुन्हे घडूच नयेत यासाठी जनजागृती करणं गरजेचं आहे, असंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री**

सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करण्यासाठी शाळांमध्येही व्यवस्था उभारणं गरज त्यांनी व्यक्त केली. या सोहळ्यात सायबर सुरक्षा विषयक माहितीपट दाखवण्यात आला. तसंच 'सायबर योद्धा' या लहान मुलांसाठीच्या कॉमिक बुकलेटचे प्रकाशन झालं. तसंच, सायबर जनजागृतीसाठी काम करणाऱ्या सायबर योद्ध्यांचा सत्कारही झाला.

<><><><>

ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या आणि कॅश ऑन डिलिव्हरीसाठी अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या ई-कॉमर्स संकेतस्थळांवर कठोर कारवाई केली जाईल, असा आश्वासन केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिलं आहे. समाज माध्यमावरच्या एका

वापरकर्त्याने ई-कॉमर्स संकेतस्थळं विविध पद्धतीने छुपी शुल्कं आकारतात, याविषयी पोस्ट केली होती. त्यात अन्नपदार्थांचं वितरण करणाऱ्या ॲप्लिकेशनकडून आकारल्या जाणाऱ्या पावसामुळे विलंब झाल्याच्या शुल्काचाही समावेश होता. या विरोधात ग्राहक संरक्षण विभागाला तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याची सविस्तर चौकशीही सुरू झाल्याचं जोशी म्हणाले.

**<><><>**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव तसंच जपानचे परिवहन मंत्री हिरोमासा नाकानो यांनी आज मुंबईत बीकेसी इथं आणि सूरतमध्ये बुलेट ट्रेनच्या कामाची पाहणी केली. कामाच्या प्रगतीबद्दल तसंच दर्जाबद्दल दोघांनी समाधान व्यक्त केलं.

**<><><>**

देशाची संरक्षण निर्यात सध्याच्या २४ हजार कोटी रुपयांवरून २०२९पर्यंत ५० हजार कोटी रुपयांपर्यंत जाईल, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले. ते आज हैदराबाद इथे तीन दिवसांच्या जैन आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेकडून आयोजित प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यात बोलत होते. ११ वर्षांपूर्वी संरक्षण निर्यात फक्त ६०० कोटी रुपयांवर होती, ती आज वाढली आहे. भारत आता संरक्षण क्षेत्रासह सर्वच क्षेत्रांमध्ये आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने प्रगतीपथावर आहे. मेक इन इंडिया उपक्रमामुळे संरक्षण प्रणालीत स्वदेश निर्मित भागांचा वापर करणं शक्य झाल्याचंही सिंह यावेळी म्हणाले.

**<><><>**

पाकिस्तानातले दहशतवाद्यांचे ९ तळ उद्धवस्त करणं हे ऑपरेशन सिंदूरचं मुख्य यश असल्याचं लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी सांगितलं.  राजस्थानातल्या श्री गंगानगरजवळ भारत पाक सरहद्दीवरच्या गावात लष्कराच्या चौकीला भेट दिल्यानंतर ते बोलत होते.

- **- -होल्ड - जनरल द्विवेदी बाइट --**

ऑपरेशन सिंदूरमधे उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ३ लष्करी अधिकारी आणि अनेक सैनिकांचा सत्कार जनरल द्विवेदी यांनी केला.

**<><><>**

देशव्यापी ई-कचरा पुनर्वापर मोहिमेची आज केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी सुरुवात केली. ही मोहीम येत्या ३१ ऑक्टोबर पर्यंत चालेल. या मोहिमेचा उद्देश निरुपयोगी झालेल्या संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, मोबाईल आणि तत्सम जुन्या उपकरणांची पद्धतशीर विल्हेवाट लावणं हा आहे.

<><><>

कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना आता त्यांच्या प्रश्नपत्रिका, उत्तरं आणि आदर्श उत्तरं पत्रिका पाहता येणार आहेत. यामुळे आदर्श उत्तरपत्रिकांना पुराव्यानिशी आव्हान देणं सोपं होणार आहे. याशिवाय, प्रश्नपत्रिकांचं वाटप, प्रश्नांना आव्हान देण्यासाठीच्या शुल्कात कपात इत्यादी बदलही आयोगानं केले आहेत. तसंच उमेदवारांच्या अडचणी सोडवण्यासाठी एक पोर्टल, अधिकृत एक्स हँडलची घोषणाही आयोगानं केली आहे.

<><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या शिरोडा वेळाघर इथल्या समुद्रात आज आठ पर्यटक बुडाले. आज संध्याकाळी चारच्या सुमाराला ही घटना घडली. यापैकी तिघांचे मृतदेह सापडले आहेत, तर एकाला वाचवण्यात यश आलं आहे. पण उपचार करताना त्याचीही मृत्यू झाला. उर्वरित चौघांचा शोध सुरू आहे. यातले काहीजण कुडाळ आणि बेळगावचे असून पाण्याचा अंदाज न आल्यानं पाण्याचा अंदाज न आल्यामुळे ते बुडाल्याचं वृत्त आहे.

<><><>

राज्य सरकारनं अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी ४ ते ६ ऑक्टोबर दरम्यान विद्यार्थ्यांना शेवटची संधी दिली आहे. याकाळात सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना नवीन नोंदणीसह प्राधान्यक्रम भरणं आणि प्राधान्यक्रमात बदल करता येणार आहे.

<><><>

पाकव्याप्त काश्मीरमधे मानवाधिकारांचं उल्लंघन झाल्याबद्दल पाकिस्तानला जबाबदार धरलं पाहिजे असा भारताचा आग्रह आहे. परराष्ट्र व्यवहारमंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना याविषयी माहिती दिली. पाकव्याप्त काश्मीरमधे निरपराध नागरिक पाकिस्तानी लष्कराच्या अत्याचारांना बळी पडत

असल्याच्या बातम्यांचा उल्लेख त्यांनी केला. पाकिस्तानची दडपशाही, आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट याचा परिणाम म्हणून पाकव्याप्त काश्मीरमधे निषेध निदर्शनं होत आहेत, अशी भारताची धारणा आहे असं ते म्हणाले.

बांगलादेशमधे अलिकडेच झालेलं जन आंदोलन भारतासह इतर देशांनी फूस लावल्यामुळे झाल्याचा बांगलादेशच्या गृह सल्लागारांचा दावा त्यांनी फेटाळून लावला. हे आरोप खोटे आणि बिनबुडाचे आहेत असं ते म्हणाले. बांगलादेशमधलं हंगामी सरकार कायदा आणि सुव्यवस्था सांभाळण्यात अपयशी ठरलं असल्याने इतरांना दोष देत आहे अशी प्रतिक्रीया जयस्वाल यांनी दिली.

<><><>

अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री आमिर खान मुत्ताकी यांच्यावरची प्रवासबंदी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं उठवली आहे. ९ ते १६ ऑक्टोबरदरम्यान ते भारत दौऱ्यावर येत आहेत. या पार्श्वभूमीवर परिषदेनं हा निर्णय घेतला. २०२१मध्ये तालिबाननं अफगाणिस्तानचा ताबा घेतल्यानंतर तालिबानच्या नेत्यानं भारतात येण्याची ही पहिलीच वेळ आहे.

<><><>

खाजगी रेडिओ प्रसारकांसाठी डिजिटल रेडिओ प्रसारण धोरण निश्चित करण्यासंदर्भातल्या शिफारसी ट्राय, अर्थात दूरसंचार नियामक प्रधिकरणानं आज जारी केल्या. मुंबई, दिल्ली, कोलकता, आणि चेन्नई या चार महानगरांमधे, तसंच नागपूर आणि पुण्यासह अ श्रेणीतल्या ९ शहरांमधे डिजिटल रेडिओ प्रसारण सेवा सुरु करण्यासाठीचं किमान शुल्क निश्चित करण्याची शिफारसही ट्रायनं केली आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या एफएम रेडिओ प्रसारकांना स्वेच्छा तत्वावर डिजिटलही, म्हणजे एकाच वेळी दोन्ही प्रकारची सेवा सुरु करायला परवानगी द्यावी, तर नवीन प्रसारकांनी दोन्ही प्रकारची सेवा एकाच वेळी सुरु करावी, अशी शिफारस ट्रायनं केली आहे. डिजिटल रेडिओ प्रसारण सेवेसाठीचा मान्यता कालावधी १५ वर्षांचा असेल. प्रसारभारतीनं आपल्या पायाभूत सेवा खाजगी प्रसारकांना सवलतीच्या दरानं भाड्यानं द्याव्यात आणि त्यांच्याकडून परिचालन खर्च पूर्णपणे घ्यावा, असं ट्रायनं सुचवलं आहे.

<><><>

नॉर्वे इथं सुरु असलेल्या जागतिक भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मीराबाई चानूनं रौप्य पदक पटकावलं. ४८ किलो वजनी गटात मीराबाईने स्नॅच मध्ये ८४ किलो तर क्लीन अँड जर्क मध्ये ११५ असं एकूण १९९ किलो वजन उचलत ही कामगिरी केली.

**<><><><>**

वेस्ट इंडिजच्या विरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात आज दुसऱ्या दिवशी भारतानं पहिल्या डावात २८६ धावांची आघाडी घेतली.

काल पहिल्याच दिवशी वेस्ट इंडीजचा पहिला डाव १६२ धावांत गुंडाळून भारतानं २ बाद १२१ धावा केल्या होत्या. आज पुढचा खेळ सुरू झाल्यावर के. एल. राहुल, ध्रुव जुरेल आणि रविंद्र जडेजा यांनी शतकं झळकावली. राहुलनं १००, ध्रुवनं १२५, तर जडेजानं नाबाद १०४ धावा केल्या. शुभमन गिल अर्ध शतक करून बाद झाला. त्यामुळे दिवसअखेर भारताला ५ बाद ४४८ अशी चांगली धावसंख्या उभारता आली. आजचा खेळ थांबला तेव्हा शतकवीर जडेजाच्या जोडीला वॉशिंग्टन सुंदर नऊ धावांवर खेळत होता.

**//<><><><>//**